# मिरा भाईंदर महानगरपालिका

## आयुक्त यांचे कार्यालय

मुख्यालय, 2रा मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
दूरध्वनी क्र.022-28192828 ई-मेल आयडी commissioner@mbmc.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. मनपा/आयुक्त/ 47 /2023-24 दि. 24 /08/2023

## आदेश

**विषय:-** निविदा परीक्षण समिती गठीत करणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागांकडून महापालिका कामाशी निगडीत अनेक निविदा काढण्यात येतात. सदर निविदा या त्रुटी पुर्ण असल्याचे लोकप्रतिनिधी व सामाजिक संस्था त्यांचे प्रतिनिधी यांनी प्रत्यक्ष भेटी मध्ये अवगत केले आहे. त्यां अनुषंगाने सद्या प्रसिध्द केलेल्या निविदांची पडताळणी करण्यासाठी महापालिका अधिकाऱ्यांची एक समिती गठीत करण्याची बाब विचाराधीन आहे.

प्रचिलत अधिनियम, नियम, खरेदी संदर्भातील विविध शासन निर्णय व परिपत्रके यांचा साकल्याने विचार होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे अर्थसंकल्पातील तरतुदी निश्चीत करत असताना सदर करावयाची कामे अथवा बाब विचारात घेतले होते किंवा कसे? याचाही विचार होणे आवश्यक आहे.

सबब, खालीलप्रमाणे 4 सदस्यांची समिती गठीत करण्यात येत आहे.

**समितीची रचना**

| अ.क्र. | नाव व पदनाम | पद |
|---|---|---|
| 1. | श्री. अनिकेत मानोरकर, अतिरिक्त आयुक्त | **अध्यक्ष** |
| 2. | श्री. संभाजी पानपट्टे, अतिरिक्त आयुक्त | सह अध्यक्ष |
| 3. | श्री. सुधीर नाकाडी, मुख्यलेखापरीक्षक | सदस्य |
| 4. | श्री. कालीदास जाधव, मुख्य लेखा व वित्त अधिकारी | **सदस्य सचिव** |

**समितीची कार्यकक्ष: -**

- ❖ सध्या प्रकाशित केलेल्या निविदांच्या प्रकरणनिहाय अटी-शर्तींची पुन:श्च पडताळणी करणे व आवश्यकता असल्यास नव्याने निश्चित करणे.
- ❖ निविदांच्या अटी-शर्तींची पडताळणी करताना आमदार/खासदार निधीतील कामे, मुलभुत सेवा समितीची कामे, शासनाकडून प्राप्त निधीतील विशिष्ट कामे तद्नंतर महापालिका निधितील कामे असा प्राधान्यक्रम ठरवावा.
- ❖ सिस्टीम ॲनालिस्ट यांचेकडून ऑनलाईन तसेच विभागाकडून ऑफलाईन सुरु असलेल्या निविदांचे दस्ताऐवज उपलब्ध करुन घ्यावेत. यामध्ये कोणतीही अडचण निर्माण झाल्यास तसे आयुक्तांचे निर्दशनास आणून द्यावे.

समितीने आपला अहवाल ७ दिवसात आयुक्तांना सादर होईल, याची खबरदारी घ्यावी.

**(संजय श्रीपतराव काटकर)**
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रति,**
**सर्व समिती सदस्य**
**सर्व खाते प्रमुख/विभाग प्रमुख**